follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासाचे

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 ✲ वर्ष २५ ✲ अंक २८८ सातारा ✲ मंगळवार ✲ दि. २ जुलै २०२४ ✲ पाने ८ ✲ किंमत ५ रू/

## महत्त्वाचे

### केळवली धबधब्यात बुडालेल्या युवकाचे शोध कार्य आजही सुरू

**परळी :** केळवली, ता. सातारा येथील धबधब्यात दि. ३० जून रोजी दुपारी बाराच्या दरम्यान धबधबा डोहात बुडालेल्या युवकाचे शोध कार्य आज सोमवार एक जुलै रोजी रात्री उशिरापर्यंत सुरू होते मात्र त्या परिसरात जोरदार सुरू असलेला पाऊस आणि सतत वाढत असलेल्या पाण्याच्या प्रवाहामुळे शोधकार्यात अडथळा येत होता. रात्री उशिरापर्यंत पोलीस दल तसेच शिवेंद्र सिंह रेस्क्यू टीमचे सदस्य शोध कार्य घेत होते.

सविस्तर वृत्त असे की, दि. ३० जुलै रोजी सकाळी ऋषिकेश दोन मित्रांसोबत केळवली येथे धबधबा पाहायला आला होता. या ठिकाणी धबधब्याखाली असलेल्या डोहात तो पोहत असताना त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने तो इतर मित्रांपासून पोहत बाजूला गेला मित्रांनी शोध कार्य सुरू ठेवले मात्र तो सापडला नाही. यावेळी त्यांनी आरडाओरडा करून सर्वांना या घटनेची कल्पना दिली. ही घटना समजतात या ठिकाणी सातारा पोलीस दल तसेच शिवेंद्रसिंह रेस्क्यू टीमचे सदस्य दाखल झाले .त्यांनी रात्री उशिरापर्यंत शोध मोहीम घेतली मात्र त्यांच्या हाती अपयश आले. आज सोमवारी एक जुलै रोजी सकाळी दहानंतर त्या ठिकाणी पोलीस निरीक्षक निलेश तांबे यांच्या अधिपत्याखाली टीम शोध कार्य घेत होती यावेळीच शिवेंद्रसिंह रेस्क्यू टीमचे चंद्रसेन पवार ,गणेश निपाने ,आदित्य पवार, सिद्धार्थ गायकवाड ,तसेच ग्रामस्थ कुटुंबीय यांनीही शोध कार्य घेतले मात्र या परिसरात सुरू असलेला मुसळधार पाऊस तसेच पाण्याच्या प्रवाहामुळे त्यांच्या हाती अपयश आले.

# पंकजा मुंडेंना विधानपरिषदेची उमेदवारी

**मुंबई, :** विधान परिषदेवरील ११ जागांच्या निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षाने उमेदवार जाहीर केले आहेत. भाजपने पाच जणांना तिकिटे जाहीर केली आहेत. पाच वर्षांपासून राजकीय पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या पंकजा मुंडे यांना भाजपने तिसरी संधी दिली आहे. त्यामुळे पंकजा मुंडे पाच वर्षांनी विधिमंडळात दिसणार आहेत. पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, परिणय फुके, योगेश टिळेकर, अमित गोरखे या पाच जणांना भाजपने विधानपरिषदेची उमेदवारी दिली आहे.



पंकजा मुंडे यांचा संसदीय राजकारणातील प्रवास काहीसा खडतर राहिला आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत बीड मतदारसंघातून त्या महायुतीतर्फे भाजप उमेदवार होत्या. परंतु महाविकास आघाडीतर्फे राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी पंकजांना पराभवाची धूळ चारली.

याआधी, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत परळी विधानसभा मतदारसंघातून बंधू धनंजय मुंडेंकडून त्यांना पराभवाचा धक्का बसला होता. त्यानंतर पंकजांना लोकप्रतिनिधित्व करण्याची संधी मिळालीच नाही. दोन वेळा खासदार राहिलेल्या बहीण प्रीतम मुंडे यांचा पत्ता कट करत भाजपे पंकजा मुंडे यांना तिकीट दिले होते, मात्र ते राखण्यात त्यांना यश आले नव्हते. रम्यानच्या काळात विधानपरिषद असो किंवा राज्यसभा, प्रत्येक निवडणुकीच्या वेळी पंकजा मुंडे यांच्या नावाची केवळ चर्चा होत असे, मात्र त्यांना एकदाही उमेदवारी मिळाली नव्हती. २०१९ च्या विधानसभेला सुरु झालेला त्यांचा राजकीय संन्यास कायम राहिला. त्याआधी देवेंद्र फडणवीस यांच्या कॅबिनेटमध्ये पंकजा मुंडे यांनी महिला व बालकल्याण विभागाचे मंत्रिपद सांभाळले आहे. विधान परिषदेच्या ११ जागांच्या निवडणुकीसाठी उद्या म्हणजेच २ जुलैपर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे. १२ जुलै रोजी रोजी मतदान असून त्याच दिवशी मतमोजणीनंतर निकाल जाहीर होणार आहेत. लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेले रावसाहेब दानवे, डॉ. भारती पवार आणि महादेव जानकर यांनाही विधानपरिषदेवर संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात होती. याशिवाय हर्षवर्धन पाटील, निलय नाईक, चित्रा वाघ आणि माधवी नाईक यांच्या नावांचीही चर्चा होती. दरम्यान, विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून तिसरा उमेदवार दिला जाण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. सत्ताधाऱ्यांना धक्का देण्याची रणनीती मविआ नेत्यांनी आखली असून त्यामुळे निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता आहे. रिक्त जागांपैकी महायुतीकडे नऊ, तर महाविकास आघाडी दोन जागा निवडून आणण्याचे संख्याबळ आहे. परंतु महाविकास आघाडी तिसरा उमेदवार उतरवून गुप्त मतदानाचा फायदा उचलण्याची चिन्हं आहेत.

अचानक घडलेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. दरम्यान या घटनेची माहिती समजताच राधानगरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत शोधकार्य सुरू केले, असून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाची एक तुकडी देखील घटनास्थळी रवाना झाली आहे. प्रशासनाच्या वतीने दोन्ही मुलांचे शोध कार्य सुरू करण्यात आले आहे. गेल्या महिन्यात देखील याच ठिकाणी एका व्यक्तीचा अशाच पद्धतीने बुडून मृत्यू झाला होता. यामुळे पर्यटकांनी वर्षा पर्यटनाला जाताना काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## सर्वसामान्य गॅसवरच; व्यावसायिक एलपीजी गॅस सिलेंडर स्वस्त

**नवी दिल्ली :** देशात तेल विकणाऱ्या कंपन्यांनी सोमवारी, दि. १ जुलै २०२४ रोजी एलपीजी सिलिंडरच्या किमती कमी केल्या आहेत. सुमारे ३० रुपयांनी या किमती कमी केल्या आहेत. एलपीजी गॅसच्या कमी केलेल्या किमतीमुळे छोटे हॉटेल दुकानदार, रेस्टॉरंट, स्वयंपाकगृहे यांना दिलासा मिळाला आहे. मात्र, घरगुती एलपीजी सिलिंडरधारकांना यातून वगळण्यात आले आहे. त्यामुळे घरगुती गॅस सिलिंडर धारकांना आहे त्याच किमंतीमध्ये गॅस मिळणार आहे. हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये वापरल्या जाणाऱ्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचे वजन १९ किलो आहे. तर, घरगुती एलपीजी सिलेंडरचे वजन १४.२ किलो आहे. त्यामुळे घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात कोणतीही कपात करण्यात आलेली नाही.



तेल कंपन्यांनी किमतीत केलेल्या बदलानंतर सोमवार, दि. १ जुलैपासून १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरची किंमत ३० रुपयांनी स्वस्त झाली आहे. त्यामुळे आता दिल्लीमध्ये व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर १६७६ रुपयांऐवजी १६४६ रुपयांना मिळणार आहे. तर, कोलकात्यात १७५६ रुपयांना एलपीजी गॅस सिलिंडर मिळेल. त्याची किंमत पूर्वी १७८७ रुपये होती.

देशाची औद्योगिक राजधानी असलेल्या मुंबईत एलपीजी गॅस सिलेंडरची किंमत ३१ रुपयांनी कमी झाली आहे. १६२९ रुपयांने मिळणारा एलपीजी गॅस सिलिंडर आता १५९८ रुपयांना मिळेल. चेन्नईमध्ये १८०९.५० रुपयांना सिलिंडर उपलब्ध आहे. घरगुती गॅस सिलेंडरचे वजन १४.२ किलो असते. मात्र, गॅस सिलेंडरच्या किंमतीत कोणतही बदल करण्यात आला नाही. ९ मार्च २०२४ रोजी गॅस सिलेंडरच्या किंमतीत शेवटचा बदल करण्यात आला. घरगुती गॅस सिलेंडरची किंमत १०० रुपयांनी कमी करण्यात आली होती. दिल्लीमध्ये घरगुती गॅस सिलेंडर ८०३ रुपये आणि मुंबईत ८०२.५० रुपयांना मिळत आहे. कोलकात्यात ८२९ रुपये तर चेन्नईमध्ये ८१८.५० रुपयांना घरगुती गॅस सिलेंडर मिळत आहे. दिल्लीमध्ये दि. १ जून २०२३ रोजी घरगुती एलपीजी सिलिंडरची किंमत ११०३ रुपये होती. मात्र, ३० ऑगस्ट २०२३ रोजी कंपन्यांनी त्यात २०० रुपयांची मोठी कपात जाहीर केली. त्यामुळे त्यांची किंमत ९०३ रुपयांपर्यंत खाली आली होती. यानंतर पुन्हा दि. ९ मार्च २०२४ रोजी कंपन्यांनी किंमत १०० रुपयांनी कमी केली होती. त्यामुळे आता तिथे ८०३ रुपयांना घरगुती गॅस सिलेंडर मिळत आहे.

## प्रसाद लाड मला हिंदुत्व शिकवणार का ? : अंबादास दानवे

**मुंबई :** लोकसभेत बोलताना काँग्रेसचे नेते आणि विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी हिंदूविषयी केलेल्या वक्तव्याचे पडसात महाराष्ट्रात सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात उमटले. भाजप आमदार प्रसाद लाड यांनी विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्यावर गंभीर आरोप केले.

लोकसभेत राहुल गांधी यांनी हिंदुत्वाबद्दल केलेल्या वक्तव्यावर प्रसाद लाड यांनी हस्तक्षेप केला. लाड आणि इतर आमदार वेलमध्ये बसले त्यामुळे कामकाज काही काळासाठी स्थगित करावे लागले. लाड यांनी परिषदेत राहुल गांधींच्या विधानाचा निषेध करण्याचा ठराव मांडला आणि तो लोकसभेत पाठवण्याची मागणी केली. लाड यांनी ठरावावर विरोधी पक्षनेत्यांनी उत्तर द्यावे अशी मागणी देखील केली. यावेळी अंबादास दानवे यांनी आपल्याशी चुकीचे वर्तन केले. त्यांनी मला आई-बहिणीवरून शिवीगाळ केल्याचा आरोप लाड यांनी केला. दानवे यांनी हिंदूंचा अपमान केल्याचे सांगत त्यांनी संपूर्ण सभागृहाची माफी मागावी असे मागणी लाड यांनी केली.लाड यांनी केलेल्या आरोपांवर बोलताना अंबादास दानवे म्हणाले, माझा काही तोल सुटलेला नाही. मी शिवसेना प्रमुखांच्या विचारांचा कट्टर शिवसैनिक आहे. माझ्यावर कोणी बोट उचलले तर त्याचे बोट मोडायची ताकद माझ्या मनगटात आहे. माझा कोणताही तोल सुटलेला नाही. जो विषयाशी संबंधीत सभागृहाचा विषय नव्हता, सभापतींना बोलले पाहिजे. माझ्याकडे बोट करून, हातवारे करून सदस्याला बोलण्याचा अधिकार नाही असे सांगत. मी शिवसैनिक आहे. मला हिंदुत्व शिकवणार प्रसाद लाड सारखा माणूस, अशा शब्दात दानवे यांनी लाड यांच्या आरोपांचा समाचार घेतला.

## अजित पवारांच्या बालेकिल्ल्यावर भाजपचे लक्ष; अमित गोरखे यांना विधानपरिषदेची उमेदवारी

**पिंपरी :** महायुतीमधील घटकपक्ष राष्ट्रवादी काँग्रेस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला मानला जात असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरावर भाजपने लक्ष केंद्रित केले आहे. भाजपच्या उमा खापरे विधानपरिषदेवर आमदार असतानाही पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे यांना विधानपरिषदेची उमेदवारी दिली आहे. त्यामुळे शहरातील राजकारणात भाजपचे वर्चस्व वाढणार असून पक्षाचे चार आमदार होतील, तर गोरखे यांच्या रूपाने शहराला पाचवा आमदार मिळेल.




पिंपरी-चिंचवड अजित पवारांचा बालेकिल्ला होता. सलग १५ वर्षे तेच शहराचे 'दादा' होते. परंतु, २०१७ मध्ये राष्ट्रवादीतून भाजपात गेलेल्या दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप, महेश लांडगे यांनी अजित पवारांच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावला. महापालिकेवर भाजपची एकहाती सत्ता आणली. असे असले तरी शहरातील राजकारणावर पवार वर्चस्व ठेऊन होते, मात्र लोकसभेतील पक्षाच्या निराशाजनक कामगिरीनंतर विश्वासू सहकारी अजित पवार यांची साथ सोडण्याची तयारी करत असताना भाजपने शहरातील पदाधिकाऱ्यांना राजकीय ताकद देण्यास सुरुवात केली आहे. आता पिंपरीतून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले अमित गोरखे यांना विधानपरिषदेची उमेदवारी दिली आहे.

भाजपने पिंपरी-चिंचवडवर विशेष लक्ष दिले असल्याचे दिसून येत आहे. यापूर्वी अमर साबळे यांना राज्यसभेची खासदारकी दिली. सचिन पटवर्धन यांना राज्य लोकलेखा समितीचे अध्यक्षपद, सदाशिव खाडे यांना तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे अध्यक्षपद आणि अमित गोरखे यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाचे अध्यक्षपद देऊन राज्यमंत्रीपदाचा दर्जा दिला होता. महापालिकेच्या माजी विरोधी पक्षनेत्या उमा खापरे यांच्याकडे महिला मोर्चाचे अध्यक्षपद दिले होते. त्यानंतर त्यांना विधानपरिषदेवरही संधी दिली. चिंचवडमध्ये अश्विनी जगताप आणि भोसरीत महेश लांडगे

## ऐन निवडणुकीच्या तोंडावर 'धर्मवीर २' येणार पडद्यावर

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे राजकीय गुरु असलेले शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या चरित्र पटाचा दुसरा भाग आईना विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर रुपेरी पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. या धर्मवीर २ च्या पोस्टरचे अनावरण नुकतेच एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

धर्मवीर चित्रपटाचा पहिला भाग सन २०२२ मध्ये प्रदर्शित करण्यात आला आणि त्याला प्रेक्षकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर काही काळातच एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाला आव्हान देऊन आपला गट हीच खरी शिवसेना असल्याचा दावा केला. त्यांच्या




समर्थक आमदारांची संख्या १४ वरून ४० पर्यंत गेली आणि महाविकास आघाडीला पायउतार करून भारतीय जनता पक्षाबरोबर जात शिंदे गटाने राज्यातील सत्ता हस्तगत केली.

त्यावेळी हा चित्रपट राजकीय उद्देशाने प्रेरित असल्याची टीका करण्यात आली होती. शिवसैनिक आणि शिवसेनेचे सहानुभूतीदार मतदार यांच्या मना शिंदे यांच्या बंडाला अनुकूल पार्श्वभूमी तयार करण्याच्या दृष्टीने हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आल्याच्या चर्चाही झडल्या.

राज्यातील विधानसभा निवडणूक ऑक्टोबर महिन्यात होण्याची शक्यता असताना धर्मवीर चित्रपटाचा दुसरा भाग दि ९ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होत आहे त्यामुळे निवडणूक प्रचार मोहिमेचा मुहूर्त साधून धर्मवीर २ च्या प्रदर्शनाची वेळ निवडली गेली असल्याच्या चर्चा सुरू होण्याची शक्यता आहे.

लोकसभा निवडणुकीत राज्यात महायुतीला अपेक्षित कामगिरी पार पाडता आलेली नाही. भारतीय जनता पक्षाची कामगिरी तर अत्यंत सुमार दर्जाची झाली आहे. भाजपचा महाराष्ट्रातील चेहरा असलेल्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खलनायक ठरविण्याचा विरोधकांचा डाव अत्यंत प्रभावी ठरला आहे. त्यातच महायुतीचे नेते सर्वकाही अलबेल असल्याचे दाखवत असले तरीही भाजपचे कार्यकर्ते आणि स्थानिक पातळीवरील नेते यांचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या कार्यकर्त्यांचे खटके वारंवार उडत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य राखायचे असेल तर शिंदे गटाला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागणार आहे. त्यासाठी धर्मवीर २ चे प्रदर्शन हातभार लावणार का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

## 'एकला चलो रे,' भूमिका नसल्याचे भाजपकडून स्पष्ट

**मुंबई:** आगामी विधानसभा निवडणुकीला सामोरे जाताना 'एकला चालो रे,' धोरणाचा अंगीकार करणार नसल्याचे भारतीय जनता पक्षाने स्पष्ट केले आहे. टीम इंडिया ने ज्याप्रमाणे एकदिलाने लढून टी २० वर्ल्ड कप जिंकला त्याप्रमाणे महायुती एकत्रित निवडणूक लढवून क्या मॅच मध्ये ही विजय मिळवेल, असे उपमुख्यमंत्री आणि भाजपाचा महाराष्ट्रातील चेहरा असलेले नेते देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

केंद्रीय पर्यावरण मंत्री व भाजपचे महाराष्ट्र प्रभारी भूपेंद्र यादव आणि अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत राज्य भाजपच्या कोअर कमिटीची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीनंतर भाजपाच्या वतीने हे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

ही निवडणूक स्वबळावर नव्हे तर महायुती म्हणून लढवायची आहे, असा केंद्रीय नेतृत्वाचा निरोप प्रभारींच्या माध्यमातून राज्यातील कोर कमिटी पर्यंत पोहोचविण्यात आला आहे महायुतीतील घटक पक्षांमध्ये समन्वय राखण्यासाठी चोख व्यवस्था निर्माण करण्याच्या सूचनाही प्रभारींनी दिल्या आहेत. लोकसभा निवडणुकीत घटक पक्षातील वरिष्ठ नेत्यांमध्ये समन्वय असला तरीही स्थानिक पातळीवर त्याचा अभाव दिसून आला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत ही चूक दुरुस्त करून स्थानिक




पातळीवरील कार्यकर्त्यांमध्ये देखील समन्वय राहील, याची काळजी घेण्याची सूचनाही प्रभारींनी केली आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षित कामगिरी करता आलेली नाही. या खालावलेल्या कामगिरीचे विश्लेषण करताना खुद्द भाजपाची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला बरोबर घेण्याची काय आवश्यकता होती, असा सवाल करण्यात आला. त्यानंतर भाजप आणि अजित पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये सामंजस्य कायम असले तरीही दोन्ही पक्षाच्या दुसऱ्या फळीतील नेते आणि कार्यकर्ते यांच्यात वारंवार शाब्दिक चकमकी घडत असल्याचे बघायला मिळत आहे.

भाजप आणि शिवसेना यांच्यातील युती नैसर्गिक असल्याबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही. मात्र, अजित पवार गटाला सामावून घेतल्यामुळे पक्षाचे नुकसान झाल्याची भावना भाजपचे तळागाळातील कार्यकर्ते ही व्यक्त करू लागले आहेत. त्याला प्रत्युत्तर म्हणून अमोल मिटकरी आणि सुरज चव्हाण असे राष्ट्रवादी कार्यकर्ते देखील भाजपवर पलटवार करीत आहेत.

या पार्श्वभूमीवर खुद्द भाजपा मध्येच पक्षाने स्वबळावर विधानसभा निवडणूक लढवावी आणि निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे काय त्या युती आणि आघाड्या कराव्या, असा मतप्रवाह जोर धरताना दिसून येत होता. भाजपाचे जुने कार्यकर्ते आणि पारंपारिक मतदार यांची देखील हीच इच्छा असल्याचे दावे करण्यात येत आहेत. मात्र, भाजप नेतृत्व सध्यातरी विधानसभा निवडणूक महायुती म्हणून लढवण्याच्या निर्णयावर ठाम असल्याचे बैठकीनंतर स्पष्ट झाले आहे.

## सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना पाच महिन्याचा तुरुगवास



**मुंबई :** महाराष्ट्रात चळवळीतील कार्यकर्ता म्हणून ओळख असणाऱ्या मेधा पाटकर यांच्याविरोधात कोर्टान निकाल दिला असून वी के सक्सेना मानहानी खटल्यात पाटकर यांना पाच महिन्याचा तुंरुगाची शिक्षा सुनावण्यात आली आहे, यासह कोर्टाने वी. के. सक्सेना यांना दहा लाखांची रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्याचे निर्देश दिले आहेत.

कोर्टाने त्यांचे वय आणि प्रकृतीची परिस्थिती पाहत त्यांना जास्त शिक्षा देता येणार नाही असे घोषित केले तसेच पाटकर यांनी सुद्धा कोर्टासमोर लगेच जामिनासाठी अर्ज दाखल केला आहे. कोर्टाने एका महिना आधीच मेधा पाटकर यांना दोषी ठरवले होते त्याचा निकाल राखून ठेवला होता, आज कोर्टाने निकाल दिला.

केवीआईसी अध्यक्ष वी. के . सक्सेना जे सध्या दिल्लीच्या उपराज्यपाल म्हणून पदभार सांभाळत आहेत, त्यांनी मेधा पाटकर यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. साधारण २३ वर्ष जुने प्रकरणात मेधा पाटकर यांना आता शिक्षा झाली. २००२ साली नर्मदा बचाओ आंदोलनात वी. के. सक्सेना आणि मेधा पाटकर वाद समोर आला होता. मेधा पाटकर यांनी वी के सक्सेना यांच्याबद्दल अपमानजनक शब्द आणि आरोप केले आहेत असा दावा करत वी. के .सक्सेना यांनी पाटकरांविरोधाच मानहानीचा दावा ठोकला होता.

# मुंबई मराठी पत्रकार संघातशतप्रतिशत 'परिवर्तन'!

## १४ पैकी १४ जागा संदीप चव्हाण यांच्या परिवर्तन पॅनलने जिंकल्या




**मुंबई :** मुंबई मराठी पत्रकार संघाच्या निवडणुकीत संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तन पॅनेलने एतिहासिक विजय मिळवला. पत्रकार संघाच्या इतिहासात इतक्या मोठ्या फरकाने सर्व १४ च्या १४ जागा जिंकण्याचा विक्रम परिवर्तन पॅनेलने केला. परिवर्तन पॅनेलचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के आणि कोषाध्यक्ष जगदीश भोवड या तिघांनीही एकूण ४८६ मतांपैकी प्रत्येकी ३०० हून अधिक मतं मिळवत दणदणीत विजय मिळवला.

उपाध्यक्षपदाच्या दोन जागांसाठी झालेल्या सर्वाधिक चुरशीच्या लढतीत परिवर्तन पॅनेलच्या स्वाती घोसाळकर आणि राजेंद्र हुंजे यांनी बाजी मारली. कार्यकारिणीच्या ९ जागांवरही परिवर्तन पॅनेलने झेंडा फडकावला. परिवर्तन पॅनेलच्या कार्यकारिणी पदावरील प्रत्येक विजयी उमेदवाराने दोनशे पार मते मिळवली. प्रतिस्पर्धी समर्थ पॅनेलच्या एकाही उमेदवाराला दोनशे मतांचा टप्पा गाठता आला नाही.

ज्येष्ठ पत्रकार डॉ. सुकृत खांडेकर हे समर्थ पॅनेलतर्फे अध्यक्षपदासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. या लढतीत संदीप चव्हाण यांनी तब्बल ३१६ मते खेचून घेत १५६ मतांच्या फरकाने विजय मिळवला. खांडेकर यांना १६० मते मिळाली.

कार्यवाह पदाच्या लढतीत परिवर्तन पॅनेलच्या शैलेंद्र शिर्केनी ३०७ मते मिळवत समर्थ पॅनेलच्या दीपक परब (१६६) यांचा पराभव केला. कोषाध्यक्षपदाच्या लढतीत जगदीश भोवड यांनी सर्वाधिक २१८ मतांच्या फरकाने सारंग दर्शने (१६६) यांचा पराभव केला.

उपाध्यक्षपदाच्या दोन जागांवर परिवर्तन पॅनेलच्या ज्येष्ठ पत्रकार स्वाती घोसाळकर यांनी २८८ मते तर राजेंद्र हुंजे यांनी २२५ मते मिळवत बाजी मारली. समर्थ पॅनेलच्या उदय तानपाठक यांना २०८ मते मिळाली तर विष्णू सोनवणे यांना २०३ मते मिळाली.

✻कार्यकारिणी सदस्यपदाच्या लढतीत दिवाकर शेजवळ आणि देवेंद्र भोगले यांना सर्वाधिक २८२ मते मिळाली.✻ नाणेफेक करून त्यातील पहिल्या क्रमांकासाठी भोगले यांची वर्णी लागली.

निकाल पुढीलप्रमाणे

अध्यक्ष

संदीप चव्हाण (विजयी)- ३१६

डॉ. सुकृत खांडेकर (पराभूत)- १६०

उपाध्यक्ष- पदे २

स्वाती घोसाळकर (विजयी)- २८८

राजेंद्र हुंजे (विजयी)- २२५

उदय तानपाठक (पराभूत)- २०८

विष्णू सोनावणे (पराभूत)- २०२

कार्यवाह

शैलेंद्र शिर्के (विजयी)- ३०७

दीपक परब (पराभूत)-

# सातारा जिल्ह्याच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढला

## कास, बामणोली, तापोळा, नवजासह कांदाटी खोऱ्यात पाऊस

**सातारा :** महाराष्ट्रात सध्या पावसाचा जोर कमी असून सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात मात्र पावसाचा जोर वाढल्याचे पाहायला मिळाले. गेल्या २४ तासांत नवजा येथे १०० तर मान्सून सुरु झाल्यापासून आतापर्यंत एकूण ९२० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्याचप्रमाणे धरण क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होत आहे. परिणामी कोयना धरणातील पाणीसाठ्याने १८ टीएमसीचे परिमाण गाठले आहे. दरम्यान सातारा शहरात पावासाने उघडीप घेतल्याचे देखील पाहायला मिळते. जिल्ह्याच्या पश्चिम भागातील कास, बामणोली, तापोळा, नवजासह कांदाटी खोऱ्यात पाऊस होत असल्याने ओढे, नाले ओसंडून वाहत आहेत.

महाराष्ट्रासह सातारा जिल्ह्यात देखील मान्सूनच्या पावसाने वेळेत एन्ट्री केली. मागील काही दिवसांपासून पावसाने चांगलीच हजेरी लावली आहे. पण नंतर काही प्रमाणात पावसाचा जोर ओसरला आणि काही दिवसांसाठी तर पावसाने दडीही दिली. यामध्येच समाधानकारक पाऊस अद्याप झालेला नाही. पण शनिवारी सकाळी आठपर्यंतच्या २४ तासांत नवजा येथे सर्वाधिक पावसाची नोंद झाली. तर कोयना नगर आणि महाबळेश्वरला १०० मिलीमीटर पेक्षा कमी पावसाची नोंद झाली. कोयना धरण पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असला तरीही पावसाचा जोर कमीच आहे. त्यामुळे धरणात पाण्याची आवक होत असली तरी ती संथगतीने होत आहे.

शनिवारी सकाळच्या सुमारास धरणात ९ हजार ८८८ क्यूसेक वेगाने पाणी येत होते. तर धरण पाणीसाठा १८.२६ टीएमसी झाला होता, टक्केवारीत हे प्रमाण १७.३५ इतके आहे. तर धरणातील उपयुक्त पाणीसाठा १३.१४ टीएमसी इतका आहे. जिल्ह्याच्या पश्चिम भागातील कास, बामणोली, तापोळा, नवजासह कांदाटी खोऱ्यात पाऊस होत असल्याने ओढे, नाले ओसंडून वाहत आहेत. कण्हेर, उरमोडी, बलकवडी, तारळी धरण क्षेत्रात पावसाचे प्रमाण कमी आहे, त्यामुळे पाणीसाठ्यात अपेक्षित वाढ झालेली नाही. जुलै महिन्यात पावसाने जोर धरल्यानंतरच धरणसाठ्यात वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सातारा शहराला अद्याप मोठ्या पावसाची प्रतिक्षा आहे. मागील आठ दिवसांपासून शहरात पावसाचा जोर ओसरला आहे. ढगाळ वातावरण असले तरी समाधानकारक पाऊस झालेला नाही. चार दिवसांपासून पावसाची उघडझाप सुरू आहे. तर शनिवारी सकाळी रिमझिम पाऊस झाल्यानंतर सातारकरांना सूर्यदर्शन देखील झाले.

## पदवीधर मतदारसंघात अनिल परब विजयी, तर कोकणचा गड भाजपाच्या डावखरेंनी राखला

# मुंबईत शिवसेना उबाठाच!

**नाशिक :** मुंबई शिक्षक मतदारसंघात लोकभारतीचे सुभाष मोरे, शिवसेना ठाकरे गटाचे ज. मो. अभ्यंकर, भाजप पुरस्कृत शिवनाथ दराडे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शिवाजीराव नलावडे, शिंदे गटाचे शिवाजी शेंडगे हे रिंगणात आहेत. सुमारे १५ हजार मतदार असलेल्या या मतदारसंघात जास्त नोंदणी केलेल्या उमेदवाराला विजयाची नेहमी संधी असते.

कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपचे विद्यमान आमदार निरंजन डावखरे आणि काँग्रेसचे रमेश कीर यांच्यात लढत झाली. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा पाच जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या या मतदारसंघात सुमारे सव्वा दोन लाख मतदार आहेत. यापैकी सुमारे एक लाख मतदार हे ठाणे जिल्ह्यातील आहेत.

**कशी होते मतमोजणी?**

पदवीधर तसेच शिक्षक मतदारसंघांमध्ये आधी सर्व मतपत्रिकांची छाननी केली जाते. त्यातील बाद मते बाजूला केल्यावर एकूण वैध मतदानाच्या पार्श्वभूमीवर मतांचा कोटा निश्चित केला जातो.

उमेदवाराला विजयासाठी पहिल्या पसंतीची तेवढी मते मिळावी लागतात. तेवढा मतांचा कोटा पूर्ण न करू शकल्यास दुसऱ्या फेरीची मतांची मोजणी केली जाते. ही प्रक्रिया फारच किचकट असते. एखादा उमेदवार पहिल्या पसंतीचा मतांचा कोटा पूर्ण न करू शकल्यास जेवढी पसंतीक्रमाची मते असतात तेवढी सारी मते मोजावी लागतात.

तेवढे करूनही उमेदवाराला मतांचा कोटा पूण करता आला नाही तर सर्व मतांची मोजणी होऊन सर्वाधिक मते मिळालेला उमेदवार विजयी घोषित केला जातो. ही मतमोजणीची प्रक्रिया वेळकाढूपणाची आहे. यामुळे मतमोजणीला बराच वेळ लागतो.

# संत तुकारामांच्या पादुकांचे दर्शन घेण्यास पुणेकरांची गर्दी

**पुणे :** पुण्यात पालख्या मुक्कामी असल्याने वारकऱ्यांना विश्रांती देहू व आळंदी येथून आषाढी वारीसाठी पंढरपूरच्या दिशेने रवाना होत असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालख्यांसह विविध वारकरी दिंडयाचे पुण्यात आगमन झाले आहे. सोमवारी पुण्यात पालख्या मुक्कामी असल्याने वारकऱ्यांना विश्रांती मिळाली असून ज्ञानेश्वर माऊलींची पालखी भवानी पेठेतील विठोबा मंदिरात तर संत तुकारामांची पालखी नाना पेठेतील निवडुंगा विठोबा मंदिरात विसावल्या आहे. सदर दोन्ही पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी सोमवारी सकाळपासूनच पुणेकर भाविकांनी मोठी गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

पुण्यातील पालखी मुक्कामा दरम्यान, पुणेकर विविध सेवा वारकऱ्यांचे करत आहे. विविध वस्तू वाटपासह, अन्नदान मोठया प्रमाणात पुणेकरांकडून करण्यात येत आहे. मुस्लिम समाजाच्या काही संघटनाकडून देखील वारकऱ्यांची सेवा केली जात आहे. पालखी सोहाळा शेकडो वर्षाची परंपरा असलेला आहे. सोहळ्यासाठी अनेकजण दरवर्षी सहकार्य करत असतात. ३०० ते ३५० वर्षापासून हा सोहळा सुरु असून त्यात कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही अशी भावना विठ्ठल मंदिराच्या विश्वस्तांनी व्यक्त केली आहे.

पुणे वाहतूक पोलीसांनी नागरिकांच्या दृष्टीने वाहतूक बदल मार्गाची सर्व माहिती एका क्लिकवर नागरिकांना उपलब्ध करुन दिली आहे. नेमके कोणते वाहतुकीचे मार्ग बंद आहे. पर्यायी रस्ते कोणते उपलब्ध आहे, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी कोणते रस्ते सुरु आहे याबाबतची सर्व

# एसी कॉँट्रॅक्टचा आनंद ठरला क्षणभंगुर

**मुंबई :** नागपुरात वातानुकूलन (एअर कंडिशनिंग) यंत्रणेचे मोठे कंत्राट मिळाल्याचा मालाडच्या मंसुरी कुटुंबियांचा आनंद क्षणभंगूर ठरला. हे कंत्राट मिळवून परतताना, अन्य वाहनाच्या चुकीमुळे या कुटुंबाच्या वाहनाला अपघात झाला. अपघात एवढा भीषण होता की त्यात तिघांचा जागीच मृत्यू झाला. फैय्याझ शकील मन्सुरी, फैझल शकील मन्सुरी व अल्तमेश मन्सुरी असे अपघातात मृत पावलेल्या व्यक्तींची नावे आहेत. त्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मंसुरी कुटुंबाचा मालाड पूर्वेच्या पठाणवाडी येथे एअर कंडिशनिंग (एसी) यंत्रणा पुरवण्याचा व्यवसाय आहे. ते कंपन्यांना एकगठ्ठा प्रमाणात (बल्क) एसी पुरवतात. अशीच मागणी नागपूरच्या एका कंपनीने केली होती. त्यासाठी मंसुरी कुटुंबातील चौघे त्यांच्या चालकासह नागपूरला चार चाकी वाहनाने गेले होते. संबंधित कंत्राट मिळवून, त्या आनंदात ते शुक्रवारी नागपूरहून समृद्धी महामार्गाने मुंबईच्या दिशेने निघाले. मात्र जालना जिल्ह्यात एक अन्य वाहन विरुद्ध दिशेने त्यांच्यासमोर आले आणि त्यांच्या वाहनाची जोरदार धडक झाल्याने मंसुरी कुटुंबियांवर काळाने घाला घातला.

ही धडक इतकी जबर होती की, फैय्याझ शकील मन्सुरी, त्यांचा भाऊ फैझल शकील मन्सुरी व पुतण्या अल्तमेश मन्सुरी यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातावेळी शकीलदेखील त्यांच्यासह होते. ते या अपघतात बचावले. हे चौघे राकेश कुमार या चालकासह नागपूरला जाऊन परतत होते. चालक राकेश कुमार हा देखील मुंबईतीलच रहिवासी असून अपघातात गंभीर जखमी झाला आहे.शकील हे लवकरच त्यांचा व्यवसाय दोन्ही मुलांकडे सोपवणार होते. मात्र त्याआधीच त्या दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यामुळे पठाणवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# श्रीमद् भागवत हा फक्त ग्रंथच नाही तर शास्त्र देखील आहे - निवृत्ती महाराज देशमुख ( इंदुरीकर )



**वळती :** वळती (ता. आंबेगांव ) येथे स्वर्गवासी विशाल बाळासाहेब गायकवाड यांच्या पुण्यस्मरणानिमित्त श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते . भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याच्या सांगता काल्याच्या किर्तनात निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर म्हणाले सध्या तरुणांमध्ये व्यसनाधिनता वाढली आहे . दारू, जुगार, शेअर मार्केट यामध्ये तरुण वर्ग गुरफटत चालला आहे . दारूमुळे अपघातांचे प्रमाण वाढून तरुणांचे अकाली मृत्यूचे प्रमाण चिंताजनक बनले आहे . पालकांनी आपल्या मुलांवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे . तरुणांना चांगले आचरण करण्यास वारकरी सांप्रदायच शिकवू शकतो . असा विश्वास समाज प्रबोधनकार ह.भ .प निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर ) यांनी व्यक्त केला .

यावेळी किरणताई दिलीप वळसे पाटील, शरद बँकेचे माजी उपाध्यक्ष शिवाजीराव लोंढे, ह. भ. प .भागवताचार्य बाळासाहेब महाराज गायकवाड, सुषमाताई शिंदे, भाऊसाहेब भापकर, सरपंच आनंद वाव्हळ, उपसरपंच तेजस भोर, मयुरी भोर, मनोहरशेठ शेळके, राजू महाराज खवळे,बाळासाहेब टेमगिरे, अमोल लोंढे, प्रकाश लोंढे पाटील आदी मान्यवर, ग्रामस्थ उपस्थित होते.

देशमुख महाराज पुढे म्हणाले श्रीमद् भागवत हा ग्रंथ नाही तर शास्त्र आहे . भागवताच्या वाचनाने मोक्षप्राप्ती निश्चित होते. ह .भ. प बाळासाहेब महाराज गायकवाड यांनी तब्बल १०८ वेळा भागवताचे वाचन केले आहे. हा त्यांचा पराक्रमच म्हणावा लागेल. संसार करणे हा पराक्रम नाही . तर संसार करताना परामर्थ करणे हा पराक्रम आहे . सांगून ते पुढे म्हणाले

सध्या मुलींचे पळून जाण्याचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे . सध्याच्या काळात प्रत्येक सुख दुःखाच्या प्रसंगी दारूचेच सेवन केले जाते. दारूबंदी विषयी कोणी बोलायला तयार नाही. यामुळे २५ ते ३० वयोगटातील तरुणांचे अकाली मृत्यूचे प्रमाण खूपच वाढले आहे.

त्यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार भागवताचार्य बाळासाहेब महाराज गायकवाड यांच्या वतीने करण्यात आला .

# लोकसभेनंतर अजित पवारांना पुन्हा धक्का?

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची अवघी एक जागा आल्याने त्यांची नामुष्की झाली आहे. तर लोकसभा निवडणुकीतील घवघवीत यशानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी विधानसभेसाठी डाव टाकायला सुरुवात केली आहे.

लोकसभा निवडणुकी मध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची अवघी एक जागा आल्याने त्यांची नामुष्की झाली आहे. तर लोकसभा निवडणुकीतील घवघवीत यशानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी विधानसभेसाठी डाव टाकायला सुरुवात केली आहे. अजित पवार यांचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी चिंचवडमध्ये शरद पवारांनी भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली आहे. अजित पवार गटाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासह १६ माजी नगरसेवकांनी शरद पवार यांची भेट घेतली आहे. त्यांचा शरद पवार गटामध्ये प्रवेश देखील होणार आहे. त्यामुळे अजित पवारांच्या बालेकिल्ल्यात पवारांनी सुरुंग लावण्यास सुरुवात केली आहे, असे सध्या चित्र आहे.

निवडणुकीमध्ये अजित पवारांना मिळालेल्या अपयशानंतर भविष्यात त्यांच्यासोबत राहणं योग्य आहे, अशी खदखद येथील काही नगरसेवकांच्या मनात आहे. त्यामुळेच की काय माजी नगरसेवकांनी शरद पवारांची पुण्यात भेट घेतली आहे. यातच भोसरीचे माजी आमदार विलास लांडे शरद पवारांच्या भेटीला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. या भेटी गाठींमुळे अजित पवार गटामध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.लोकसभा निवडणुकीनंतर अनेक जण घरवापसी करण्याच्या तयारीत असल्याचे पाहायला मिळत आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांकडून रणनीती आखण्यास सुरूवात झाली आहे. शरद पवारांची भेट घेतलेल्या आठ माजी नगरसेवकांची नावे देखील समोर येत आहेत. त्यामध्ये अजित पवार गटाचे पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, विलास लांडे यांचे सुपुत्र विक्रांत लांडे, समीर मासुळकर, संजय वाबळे, राहुल भोसले, विनया तपकीर, वैशाली घोडेकर या माजी नगरसेवकांनी शरद पवारांची नुकतीच भेट घेतली आहे. त्यांचा पक्षप्रवेश देखील होणार असं असल्याची माहिती समोर आली आहे.दरम्यान, येणाऱ्या काळामध्ये अजित पवारांचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी चिंचवडमध्ये काहीजण घरवापसी करण्याच्या मनस्थितीत दिसत आहेत. याचा मोठा फटका अजित पवारांना बसू शकतो. येत्या काही दिवसांमध्ये पिंपरी चिंचवड मधील चित्र स्पष्ट होणार आहे.

# राज्यावर 'झिका' संसर्गाचं सावट

**नाशिक :** पुणे शहरात 'झिका'चा रुग्ण आढळल्यानंतर नाशिकमधील वैद्यकीय विभाग 'अॅलर्ट मोड'वर आला आहे. अगोदरच शहरात स्वाइन फ्लू आणि डेंग्यूचे रुग्ण आढळत असल्याने 'झिका'चा शिरकाव होऊ नये यासाठी आरोग्य-वैद्यकीय यंत्रणेकडून उपाययोजनांना वेग देण्यात आला आहे.

महापालिकेकडून शहरात साथरोग नियंत्रणासाठी 'रॅपिड रिस्पॉन्स टीम' कार्यरत करण्यात आली असून, मुख्यालय स्तरावर साथरोग नियंत्रण अधिकारी, क्षेत्रिय स्तरावर नोडल अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली आशा, अंगणवाडी सेविकांमार्फत दैनंदिन घरभेटींमध्ये वाढ करण्यात आल्याची माहिती मुख्य आरोग्य तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण यांनी दिली. शहरात पावसाळ्याच्या तोंडावर डेंग्यू आणि स्वाइन फ्लूचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. या साथरोगांमुळे पालिकेचे टेन्शन वाढले असतानाच आता राज्यात 'झिका' या विषाणूची 'एंट्री' झाली आहे. पुण्यातील एरंडवणा परिसरामध्ये 'झिका'चे तीन रुग्ण आढळले आहेत. ४६ वर्षीय डॉक्टर आणि त्यांच्या १५ वर्षीय मुलीला 'झिका'चा संसर्ग झाला असून, त्यांच्या संपर्कातील आणखी एकजण 'झिका'ने बाधित झाला आहे. नाशिक-पुणे 'कनेक्शन' पाहता नाशिकमधील आरोग्य यंत्रणा 'अॅलर्ट मोड'वर आली आहे. नाशिकमधून पुण्यात, तसेच पुण्यातून नाशिकमध्ये दररोज शेकडो जण कामानिमित्त, शिक्षणासाठी ये-जा करीत असतात. परिणामी पुण्यातील 'झिका'चा प्रादुर्भाव नाशिकमध्येही होण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे महापालिकेने सावधगिरी बाळगत तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजनांवर भर दिला असून, कीटकजन्य आजारांवर नियंत्रणासाठी महापालिकेच्या माध्यमातून धूर, जंतूनाशक फवारणी केली जात आहे.

साथरोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जनजागृती केली जात आहे. वैद्यकीय पथकांमार्फत घरोघरी भेटी देऊन संशयित रुग्णांविषयी माहिती घेतली जात आहे. 'झिका' चे संशयित रुग्ण आढळल्यास रुग्णाचे रक्तनमुने पुणे येथील राष्ट्रीय विषाणू संशोधन संस्थेकडे पाठविण्यात येतील, ताप, स्नायूदुखी, डोकेदुखी अशी लक्षणे आढळल्यास तत्काळ डॉक्टरांना दाखवावे. अशी माहिती डॉ. चव्हाण यांनी दिली आहे. आजारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत.

# 'मविआ'मध्ये जिल्हयातील ५० टक्के जागा द्या

## जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीत ठराव

**सातारा :** आगामी विधानसभा निवडणूकीसाठी जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघापैकी जिल्हा काँग्रेसने प्रदेश कांग्रेस कमिटी व महाविकास आघाडीकडे ५० टक्के जागांची मागणी करावी. या सर्व जागा निवडणू आणण्यासाठी कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या ताकदीने प्रयत्न करतील असा एकमुखी ठराव समोवारी झालेल्या जिल्हा काँग्रेसच्या कार्यकारीणी बैठकीत घेण्यात आला.

सातारा जिल्हा काँग्रेस कार्यकारीणीची बैठक सोमवारी जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेशराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा प्रभारी श्रीरंग (नाना) चव्हाण-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी अ.भा काँग्रेस कमिटीचे सदस्य रणजितसिंह देशमुख, प्रदेश सचिव राजेंद्र (आप्पा) शेलार, महिलाध्यक्षा अल्पनाताई यादव, जिल्हा सरचिटणीस नरेश देवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आगामी विधानसभा निवडणूकीबाबत राजकीय स्थितीवर चर्चा करताना जिल्हयातील सर्वच तालुकाध्यक्षांनी विधानसभा निवडणूका या महाविकास आघाडीचे माध्यमातून लढवल्या जाणार आहेत. सातारा जिल्हयातील पन्नास टक्के म्हणजे आठ पैकी चार विधानसभा मतदारसंघ काँग्रेस पक्षाला देण्याची मागणी जिल्हा काँग्रेस कमिटीने प्रदेश काँग्रेसकडे करुन प्रदेश काँग्रेसने महाविकास आघाडीकडे प्रस्ताव ठेवावा. जिल्ह्यातील आठ विधानसभापैकी चार विधानसभा निवडणूक लढविण्याबाबत कार्यकर्ते आग्रही असून याबाबत जिल्हा काँग्रेस कमिटीने राज्याचे नेते माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज (बाबा) चव्हाण यांच्यामार्फत ही मागणी प्रदेश कांग्रेस, मविआकडे करावी.

यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेशराव जाधव यांनी जिल्हा कॉंग्रेस कमिटीने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीकडे प्रस्ताव पाठवून निम्म्या जागा मागणीवर आपण ठाम राहू असे सांगितले. तर जिल्हा प्रभारी श्रीरंग (नाना) चव्हाण-पाटील यांनी लोकसभा निवडणूकीमध्ये जिल्हयातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी झोकून देऊन काम केले. मात्र थोडक्यात पराभवाला सामोरे जावे लागले याची सल आहेच पण आता मागे वळून न पाहता आगामी येणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी तयार रहावे. जिल्हयातील जास्तीत जास्त मतदारसंघ काँग्रेसला घेण्याचे माझे प्रयत्न राहतील तसा प्रयत्न मी प्रदेश काँग्रेसेकडे प्रामुख्याने करेन असे आश्वासन दिले. यावेळी लोकसभा निवडणुकीतील कामाचा आढावा घेत यापुढे महाविकास आघाडी व घटक संघटना यांनी विधानसभेच काम केले तर सर्वच जागा जिंकणे अवघड नसल्याचे मत तालुकाध्यक्षांनी व्यक्त केले. बैठकीत राहुल गांधी तसेच महाराष्ट्रात लोकसभेला १३ जागा मिळाल्याबद्दल विविध नेतेमंडळीचे अभिनंदनाचा ठरावही करण्यात आला.

बैठकीस महिला प्रदेश सचिव धनश्री महाडीक, प्रदेश प्रतिनिधी बाबासाहेब कदम, रफिकशेठ बागवान, राजूभैय्या मुलाणी, तालुकाध्यक्ष सातारा, संदीप चव्हाण, कोरेगाव ड. श्रीकांत चव्हाण, पाटण - अभिजीत पाटील, जावली संदीप माने, वाई विलास पिसाळ, खंडाळा - सर्फराज बगवान, खटाव- डॉ. संतोष गोडसे, महाबळेश्वर - नंदकुमार बावळेकर, सेवादल जिल्हाध्यक्ष प्रतापराव देशमुख, विराज शिंदे, कल्याण युवक अध्यक्ष अमराजीत कांबळे, कल्याण पिसाळ, अन्वर पाशा खान, एम. के. भोसले, अमित जाधव, सलीम बागवान, उमेश मोहिते, नाजीम इनामदार, डॉ. शंकर पवार, राजेंद्र चव्हाण इत्यादी प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# सर्वधर्मीय दिंडीने दिला ऐक्याचा संदेश!

## वारीनिमित्त आयोजित सर्व धर्मीय ऐक्य दिंडीला चांगला प्रतिसाद !

**पुणे :** पंढरपूर वारीनिमित्त पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या 'सर्वधर्मीय ऐक्य दिंडी'ला चांगला प्रतिसाद मिळाला .मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँक,रिझवानी मस्जिद ट्रस्ट,सुफी वारकरी विचारमंच आणि साखळीपीर तालीम तालीम राष्ट्रीय मारुती मंदिर यांच्या विद्यमाने दि.१ जुलै रोजी सर्व धर्मीय ऐक्य दिंडीचे आयोजन सकाळी साडे दहा वाजता करण्यात आले .साखळीपीर तालीम(नाना पेठ) येथे सर्वधर्मीय धर्म गुरु,'डॉ.पी.ए.इनामदार युनिव्हर्सिटी 'चे कुलपती डॉ. पी.ए.इनामदार,साखळीपीर तालीमचे अध्यक्ष रवींद्र माळवदकर,प्रशांत



कोठडिया,ग्यानी प्रतापसिंह गुरूद्वारा गणेश पेठ, दिंडी क्रमांक ३४ चे भास्कर मोरे महाराज, ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी चे योगी निरंजन नाथ महाराज,भंते सुदस्सन महाराज बौद्ध धर्मगुरु यांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला. अंगरशा बाबा दर्गा मार्गे रिझवानी मस्जिद (गंज पेठ)येथे समारोप झाला.

शिवानी माळवदकर,रिझवानी मस्जिद ट्रस्टचे विश्वस्त अंजुम भाई,सुफी वारकरी विचार मंचचे अध्यक्ष मशकूर अहमद शेख,सचिव उमर शरीफ शेख,आझम ट्रस्टचे विश्वस्त अब्दुल वहाब शेख यांनी संयोजन केले. सहभागी वारकऱ्यांना व्हेज बिर्याणी,शीरखुर्मा वाटप करण्यात आले .'डॉ. पी.ए.इनामदार युनिव्हर्सिटी 'च्या वतीने वारकऱ्यांना रेनकोट वाटप करण्यात आले. दिंडीचे हे पाचवे वर्ष होते.

'गेल्या अनेक वर्षांपासून सर्वधर्म दिंडी साखळी पीर तालमीच्या वतीने काढण्यात येते, आणि या वारीत मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख आदी धर्मगुरू सहभागी होत असतात. या वारीत सहभागी होण्यासाठी डॉ.पी. ए. इनामदार हे देखील सहभागी होत असून ते पुण्याच्या शैक्षणिक क्षेत्रात महात्मा ज्योतिबा फुले यांचा वारसा पुढे चालवत आहेत ', असे गौरवोद्गार रवींद्र माळवदकर यांनी काढले.

डॉ.पी. ए. इनामदार म्हणाले, 'मी स्वतः मुस्लिम असलो तरी मी सर्व धर्म समभाव मानणारा आहे, आणि मी कृतीशील सर्व धर्म समभाव पाळतो, म्हणूनच माझ्या शैक्षणिक संस्थेत सर्व धर्मीय शिक्षक,प्राध्यापक आहेत,आम्ही सर्व धर्मांच्या उपक्रमात सहभागी होतो. त्यामुळे आजच्या या सर्वधर्म दिंडीत सहभागी होताना मला आनंद होत आहे.पुणे हे धार्मिक एकोपा जपणारे शहर आहे.हा नावलौकिक कायम ठेवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत'.

## डोंबिवलीत उघड्यावरील दारूच्या दुकानांनी रहिवासी हैराण

**डोंबिवली :** गेल्या आठवड्यापासून कल्याण डोंबिवली पालिका प्रशासन आणि पोलिसांनी बेकायदा प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या, बेकायदा डान्स बार, लेडिज बारवर कारवाई सुरू केली आहे. पालिका आणि पोलिसांनी आता कल्याण, डोंबिवली शहराच्या विविध भागात उघड्यावर विदेशी, गावठी दारू विक्री करणाऱ्या अड्ड्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

हे नागरिक मद्य पिऊन धुंद झाले की या दारू अड्ड्याच्या भागात ओरडा करत, एकमेकांशी भांडण करत बसतात. रात्रभर हा ओरडा दारूड्यांचा सुरू असल्याने हनुमान मंदिर भागातील त्रस्त आहेत. या दारू अड्ड्यापासून दहा मिनिटांच्या अंतरावर विष्णुनगर पोलीस ठाणे आहे. यापूर्वी कधीच पोलिसांनी या दारू अड्ड्यावर कारवई केलेली नाही, असे स्थानिक रहिवासी सांगतात. दारू पिऊन काही जण याच भागात पडतात.

हैदराबाद, दि.१(वृत्तसंस्था) : केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी हैदराबादमधील शमशाबाद येथील नोवोटेल येथे तंबाखू उत्पादक शेतकरी, उत्पादन निर्यातदारांसोबत बैठक घेतली. या वेळी संबोधित करताना गोयल यांनी, फ्ल्यू क्युअर्ड व्हर्जिनिया तंबाखूसाठी शेतकऱ्यांना विक्रमी उच्च किंमत मिळाल्याबद्दल तसेच आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये भारतीय तंबाखूच्या विक्रमी उच्च निर्यात कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले.

## 'प्रत्येक रामभक्ताचे मत भाजपाला मिळेल हा अहंकार'

**नवी दिल्ली :** ४ जून या दिवशी लोकसभा निवडणुकीचा निकाल लागला. हा निकाल लागून आज २६ दिवस झाले आहेत. तरीही निकालांवरच्या चर्चा आणि प्रतिक्रिया थांबताना दिसत नाहीयेत. प्रत्येक रामभक्ताने मोदींना मत दिलं असेलच असं नाही असं आता भाजपा नेत्या उमा भारतींनी म्हटलं आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान आणि पश्चिम बंगाल या चारही राज्यांमध्ये भाजपाला फटका बसला. राम मंदिर उभारुनही उत्तर प्रदेशात म्हणावं तसं यश भाजपाला मिळालं नाही. यावर आता उमा भारतींनी प्रतिक्रिया दिली आहे.

उत्तर प्रदेशात लोकसभा निवडणुकीचा जो निकाल लागला त्यासाठी मोदी आणि योगी आदित्यनाथ यांना जबाबदार धरता येणार नाही. १९९२ मध्ये बाबरी मशिद पाडल्यानंतरही भाजपाला पराभवाचा फटका बसला होता. तरीही आम्ही राम मंदिर बांधलं. राम मंदिर हे आमच्या अजेंड्यावर होतं आणि आम्ही ते पूर्ण केलं. आम्ही राम मंदिर हे कधीही मतांशी जोडलेलं नाही. याच प्रमाणे मथुरा आणि काशी या ठिकाणी असलेल्या धर्मस्थळांचेही वाद आहेत. मात्र आम्ही त्या प्रश्नांचा संबंध आम्हाला मिळणाऱ्या मतांशी जोडत नाही. हिंदू समाजाचा एक प्रकारचा स्वभाव आहे, तो समजून घेतला पाहिजे. सामाजिक व्यवस्था धर्माशी जोडायला नको असंही उमा भारतींनी म्हटलं आहे.

प्रत्येक रामभक्ताचं मत आपल्यालाच मिळेल हा अहंकार भाजपाने बाळगायला नको.

## ठाकरे गट ही 'देना बँक नव्हे लेना बँक'

**मुंबई :** ठाकरे गट ही लेना बँक आहे, देना बँक नाही. त्यांचे सर्व आयुष्य खोके जमा करण्यात गेले अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर केली आहे. दरम्यान, रविवारी शिंदे सरकारला दोन वर्षे पूर्ण झाली. यामुळे आमदार आदित्य ठाकरे यांनी 'जागतिक खोके आणि धोके दिवस साजरा होत आहे', असा टोला लगावला होता. यावरच मुख्यमंत्री शिंदे यांनी पलटवार केला आहे. ते एएनआयशी बोलत होते.

यावेळी उद्धव ठाकरे यांच्याबाबत बोलतांना मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले आहे की, ''लोकसभेला ठाकरे गटाच्या काही जागा कोणामुळे निवडून आल्या हे सर्वांना माहिती आहे. काँग्रेसची व्होट बँक त्यांच्याकडे आली. मात्र, काँग्रेसची व्होट बँक तात्पुरती आहे. ही तात्पुरती आलेली सूज आहे. सूज जास्त काळ राहत नाही. उद्धव ठाकरे यांनी जी भूमिका घेतलेली आहे, ती भूमिका शिवसेनेच्या मूळ मतदारांना आवडलेली नाही. त्यामुळे लोकसभेला त्यांच्या फक्त ९ जागा निवडून आल्या'', असा टोला मुख्यमंत्री शिंदे यांनी लगावला आहे.तसेच शिंदे पुढे म्हणाले की, ''लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाला लोकांनी त्यांची जगा दाखवली आहे. ठाकरे गटाची जागा फक्त आरोप करणाऱ्यांमध्ये आहे. माझ्याकडे त्यांच्याविषयी भरपूर माहिती आहे. लखनौमध्ये त्यांची २०० एकर जागा आहे. आणखी कुठे काय काय आहे? सर्व माझ्याकडे आहे. मात्र, मी आरोपाला फक्त

## पर्यटनासाठी आलेल्या निपाणीतील दोन तरुण दूधगंगा नदीत गेले वाहून गेले

**कोल्हापूर, :** कोल्हापूरसह पश्चिम घाटमाथ्यावर जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे, यामुळे नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तर पर्यटक देखील आता वर्षा पर्यटनाकडे वळत असून नुकतीच पुण्यात पाण्याच्या प्रवाहात एक कुटुंब वाहून गेल्याची धक्कादायक घटना घडली होती. आता कोल्हापुरात देखील नदीच्या प्रवाहात दोन युवक वाहून गेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गणेश चंद्रकांत कदम (वय वर्ष १८) आणि प्रतीक पाटील (वय वर्ष २२) दोघे रा. निपाणी, जि. बेळगाव येथील रहिवासी असून वर्षा पर्यटनासाठी आले होते.

बेळगाव जिल्ह्यातील निपाणी येथे १३ जण वर्षा पर्यटनासाठी राधानगरी येथे आले होते. आज दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास पर्यटक काळम्मावाडी धरण परिसरातील दूधगंगा नदी येथे गणेश चंद्रकांत कदम हा युवक पोहता येत नसताना काळम्मावाडी धरणासमोरील दूधगंगा नदी पात्रातील पाण्याच्या डोहात उतरला. त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने तो डोहात बुडू लागला यावेळी तो बुडत असतानाचे पाहून त्याचा मित्र गाडीचा ड्रायव्हर प्रतीक पाटील (वय वर्ष २२) हा त्याला वाचवण्यासाठी पाण्यात उतरला मात्र तोही पाण्याचा प्रवाहात वाहून गेला आहे.

नदीला प्रवाह मोठा असल्याने या प्रवाहातून दोघांना बाहेर पडणे अशक्य झाले. यावेळी सोबत असलेल्या सहकार्यांनी दोघांनाही वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र नदीला तीव्र प्रवाह असल्याने दोघेही प्रवाहात वाहून गेले. यापैकी प्रतीक पाटील हा वाहनचालक होता.

# देशभरात मागील वर्षी आढळल्या प्राणी व वनस्पतींच्या शेकडो नव्या प्रजाती

**कोलकाता:** देशभरात सन २०२३ या वर्षी प्राण्यांच्या तब्बल ६४१ तर वनस्पतींच्या ३३९ नवीन प्रजाती आढळून आल्या आहेत. त्यापैकी प्राण्यांच्या ४४२ प्रजाती जगभरात प्रथमच आढळून आले असून १९९ प्रजाती भारतात प्रथम आढळून आल्या आहेत. वनस्पतींच्या नव्या प्रजातींपैकी १७१ प्रजातींचा शोध नव्याने लागला आहे तर १६८ प्रजाती भारतात प्रथमच आढळून आल्या आहेत. नव्याने आढळून आलेल्या प्रजातीमध्ये हळदीची नवी प्रजाती (मणिपूर) आणि वटवाघळाची नवी प्रजाती (कर्नाटक) यांचाही समावेश आहे.

भारतीय प्राणीशास्त्रीय सर्वेक्षण संस्थेच्या १०९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात भारतातील सर्व प्राण्यांच्या प्रजातींची यादी असलेल्या पोर्टलचे लोकार्पण केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते करण्यात आले. अशाप्रकारे प्राण्यांची यादी आंतरजालावर उपलब्ध करून देणारा भारत हा पहिला देश ठरला आहे.

याच कार्यक्रमात सन २०२३ मध्ये नव्याने आढळून आलेल्या प्राणी व वनस्पतींच्या प्रजातींची माहिती देणाऱ्या भारतीय प्राणिशास्त्र सर्वेक्षण संस्था आणि भारतीय वनस्पतीशास्त्र सर्वेक्षण संस्था यांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालाचे प्रकाशनही करण्यात आले. या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. नव्याने आढळून आलेल्या प्राणी आणि वनस्पतींच्या प्रजाती सर्वाधिक संख्येने पश्चिम घाट आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये आढळून आल्या आहेत.

प्राणी आणि वनस्पतींच्या नव्याने आढळून आलेल्या प्रजाती या निव्वळ योगायोगाने अथवा अपघाताने आढळून आलेल्या नाहीत. त्यांना आजूबाजूला पोषक वातावरण मिळाल्याने त्या विकसित होत असतात. त्यामुळे केवळ प्राणी आणि वनस्पतींच्या धोक्यात असलेल्या प्रजातींच्या संरक्षणासाठी प्रयत्न न करता त्यांना योग्य अधिवास प्राप्त व्हावा यासाठी पर्यावरण संरक्षणाचे व्यापक प्रयत्न आवश्यक आहेत, असे यावेळी पर्यावरण मंत्री यादव यांनी नमूद केले.

## श्रमिक महासंघाच्यावतीनं ८ जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**कोल्हापूर :** या कार्पोरेट लुटीविरुद्ध जागृती करण्यासाठी आणि शक्तिपीठ महामार्ग आणि स्मार्ट प्रीपेड मीटर कायमचं हद्दपार करण्याकरता महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाच्या वतीनं ८ जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत अशी माहिती श्रमिक महासंघाचे अध्यक्ष कॉम्रेड अतुल दिघे आणि कॉम्रेड प्रकाश कांबरे यांनी पत्रकार बैठकीत दिली.

महाराष्ट्रामध्ये शक्तिपीठ महामार्ग आणि स्मार्ट प्रीपेड मीटर योजना राबवण्यासाठी कार्पोरेट शक्ती कार्यरत आहे. त्यांना मदत करण्यासाठी शासकीय यंत्रणा आणि सत्तेमधील काही लोकप्रतिनिधींचे हात सरसावत आहेत. निव्वळ सर्वसामान्य जनतेच्या पैशाची लूट करणं हेच एकमेव उद्दिष्टे घेऊन या कार्पोरेट कंपन्या पुढं आल्या आहेत. शक्तिपीठ महामार्गामुळे कुणाचाही फायदा होणार नाही असं असताना महाराष्ट्र शासन कार्पोरेट कंपन्यांचा फायदा करण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करत असून जोपर्यंत शक्तिपीठ महामार्ग आणि स्मार्ट प्रीपेड मीटर कायमचं रद्द होत नाही तोपर्यंत हा संघर्ष चालूच राहणार असल्याचा इशारा महासंघानं दिलाय. या पत्रकार बैठकीला श्रमिक महासंघाचे अध्यक्ष कॉम्रेड अतुल दिघे, कॉम्रेड प्रकाश कांबरे,कॉम्रेड सुरेश पाटील, प्रकाश जाधव ,राजकुमार जाधव, रजनी पाटील,संजय गावडे यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांनी सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करून युवा पिढीने नवउद्योजक बनावे- पन्हाळा गटविकास अधिकारी सोनाली माडकर यांचे आवाहन



पन्हाळा येथे कृषी दिनानिमित्ताने शेतकऱ्यांचा सन्मान करताना आधीकारी व कर्मचारी

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा :** शेतकऱ्यांनी सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करून युवा पिढीने नवउद्योजक बनावे,असे आवाहन पन्हाळा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सोनाली माडकर यांनी केले. त्यांनी कृषी दिनानिमित्त कै. वसंतराव नाईक जयंती आयोजित पन्हाळा पंचायत समिती येथील कार्यक्रमात बोलत होत्या.

गट विकास अधिकारी सोनाली माडकर यांनी मार्गदर्शन करतान कै. वसंतराव नाईक यांचे कार्य आणि शेतकऱ्यांनी सेंद्रीय शेती कशी करावी त्याचा फायदा याची महिती सांगितली.

याप्रसंगी तालुक्यातील प्रयोगशील शेतकऱ्यांचा तसेच कृषि सेवा केन्द्र उद्योजक यांचा प्रशस्तिपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.

राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रमांतर्गत उल्लेखनीय कामकाज केलेल्या ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांचा प्रशस्तिपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी शेतकऱ्यांना नॅनो खतांच्या बाबतीत इफ्को जिल्हा व्यवस्थापक विजय बुनगे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास बहुसंख्य शेतकरी तसेच कृषी विभागाचे क्षेत्रीय कर्मचारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन कृषी अधिकारी शरद शिंदे यांनी केले आभार सहाय्यक गट विकास अधिकारी अविनाश मेश्राम यांनी केले. कार्यक्रमास कृषी विस्तार अधिकारी संजय देसाई,शिवाजी कोळी अभिजीत गावडे, चंद्रशेखर पाटील, सुदर्शन पाटील उपस्थित होते.

## ९५ लाख ६९ हजार किंमतीचे दागिने असलेली बॅग लंपास; मध्यवर्ती बसस्थानक परिसरातील घटना

**कोल्हापूर :** कोल्हापूरहून पुण्याकडे निघालेल्या एका होलसेल दागिने विक्रेत्याची सुमारे ९५ लाख ६९ हजाराचे दागिने असलेली बॅग अज्ञात चोरट्याने मध्यवर्ती बस स्थानक परिसरातून लंपास केली. रविवारी सायंकाळी घडलेल्या घटनेची फिर्याद सुजितसिंग चौहान यांनी शाहूपुरी पोलिसात दिली असून अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई येथील होलसेल सोन्या-चांदीचे दागिने विक्री करणारे विक्रेते सुजितसिंग चौहान हे गुरुवारी २८ तारखेला मुंबईहून कोल्हापूरकडे येण्यासाठी निघाले. येताना पुण्यात मुक्काम करून तेथील काही सराफांची भेट घेवून त्यांना नवीन दागिन्यांची माहिती दिली. रविवारी सकाळी ते कोल्हापुरात आले. चौहान यांनी कोल्हापुरात गुजरी येथील काही सराफ व्यवसायिकांना आपल्याकडील दागिने दाखवले. यानंतर सायंकाळी ते कोल्हापूरहून पुण्याकडे निघाले होते. रविवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ते कोल्हापुरातील मध्यवर्ती बस स्थानकातून शिवनेरी बस मधून पुण्याकडे जाण्यासाठी निघाले. यावेळी एसटीच्या रॅकमध्ये ठेवलेली सुमारे ९५ लाख ६९ हजार रुपयाचे दागिने असलेली बॅग अज्ञाताने लंपास केलीय. याप्रकरणी सुजितसिंग चौहान यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शाहूपुरी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आलाय. शाहूपुरी पोलिसांचे पथक चोरट्याचा शोध घेत असून लवकरच त्याला ताब्यात घेऊन मुद्देमाल हस्तगत करू, अशी माहिती पोलीस निरीक्षक अजय सिंदकर यांनी दिली.

## अनिल बागणे यांच्या वाढदिनी ११०० झाडांचे वृक्षारोपण

### विद्यार्थी, शिक्षकांचा सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक गावात उपक्रम



जयसिंगपूर येथे वाढदिवसानिमित्त अनिल बागणे यांचा सन्मान करताना माजी राज्यमंत्री आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर व मान्यवर

**शिरोळ :** यड्राव येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलजीचे एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांच्या वाढदिवस कोल्हापूर, सांगली व सीमा भागातील अनेक गावात ११०० पेक्षा अधिक झाडांचे वृक्षारोपण करुन साजरा करण्यात आला. शरद शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी व शिक्षकांनी मिळून हा सामाजिक उपक्रम राबविला.

उद्योजक श्री. बागणे यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेकडून प्रत्येकवर्षी सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. यावर्षी विद्यार्थी व सर्व स्टाफने महावृक्षारोपण केले. कोल्हापूर, सांगली जिल्ह्यासह कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या गावात, घराच्या परिसरात, सार्वजनिक जागेत व शेतात वृक्षारोपण केले. यामध्ये सिताफळ, आवळा, जाभुळ, चिंच या फळझाडांसह इतर झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. वाढदिवसानिमित्त शनिवार सायंकाळपासूनच वृक्षारोपणास सुरुवात झाली. दिवसभर विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करुन सोशलमिडीयावर फोटो शेअर केले. शरद इंजिनिअरिंग, शरद पॉलिटेक्निक, शरद कृषी, शरद आयटीआय, शरद सायन्स ॲण्ड कॉमर्स, शरद हॉस्पिटल, शरद फार्मसी, शरद नर्सिंग, शरद स्कूल या संस्थानी हा उपक्रम राबविला. विद्यार्थ्यांनी सर्व महाविद्यालय परिसरातही वृक्षारोपण करण्यात केले. माजी राज्यमंत्री आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी सन्मान करुन शुभेच्छा दिल्या.

## दुधाला तातडीने प्रति लिटर ४० रूपये दर द्या; कोल्हार-घोटी राज्य मार्गावर रास्ता रोको आंदोलन



**संगमनेर :** दुधाला तातडीने प्रति लिटर ४० रूपये दर द्यावा, जो व्यावहारिक दृष्ट्या देणे अत्यंत गरजेचे आहे. जेव्हा पासून दुधाचे दर पडले आहेत, तेव्हापासून आतापर्यंत दुधाच्या दरातील फरकाची नुकसान भरपाई प्रति लिटर १५ रूपये याप्रमाणे रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर जमा करावी. आदी मागण्यांसाठी शुक्रवारी (दि.२८) कोल्हार-घोटी राज्य मार्गावर चिखली गावात रास्ता रोको आंदोलन सुरू आहे.शिव आर्मी दूध उत्पादक शेतकरी संघटनेच्या वतीने हे आंदोलन करण्यात येत आहे. यातसंगमनेरतालुक्याच्या ग्रामीण भागातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. राज्य मार्गाच्या दोन्ही बाजूला लांबवर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत.

# भारतीय जनता पार्टी महिला मोर्चातर्फे महायुती शासनाचे अभिनंदन

## पंचालाडू वाटून केला आनंद साजरा



**सातारा :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ जी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये, विद्यार्थिनींना मोफत शिक्षण, अन्नपूर्णा योजना, लाडकी बहीण योजना या आणि अशा प्रकारच्या महिलां च्या समृद्धीसाठी योजना आणून त्यासाठी भरीव आर्थिक तरतूद केल्याबद्दल भारतीय जनता पार्टीच्या सातारा जिल्ह्यातील सर्व महिला तर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले

सातारा येथील पोवई नाक्यावर भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चा आणि इतर मोर्चा आघाडीच्या सर्व महिलांच्या तर्फे लाडू वाटून महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करण्यात आले

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना यामुळे एक हजार पाचशे रुपये प्रति महिना महिलांना मिळणार आहेत यामुळे त्यांच्या संसाराला थोडा हातभार लागेल , मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेमुळे जवळजवळ एकावन्न लाख कुटुंबांना वर्षभरात तीन सिलेंडर मोफत मिळणार आहेत, मुलींसाठी मोफत शिक्षण ही योजना राबवून महायुती सरकारने मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित केले आहे , मुलींच्या शिक्षणाचा सर्व खर्च महाराष्ट्र शासन करणार आहे या आणि महिलांच्या समृद्धीच्या अनेक योजना राबवून अर्थसंकल्पामध्ये तरतूद करून महाराष्ट्र शासनाने महिलांच्या जीवनाचा स्तर उंचावल्याबद्दल भारतीय जनता पार्टीतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले

यावेळी प्रदेश कार्यकारी सदस्या सुवर्णाताई पाटील , महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा रेणूताई येळगावकर, महिला मोर्चा प्रदेश चिटणीस सुनिषाताई शहा, सोलापूर येथील प्रदेश सचिव रंजिता चाकोते , ओबीसी मोर्चा महिला जिल्हा अध्यक्षा वनिता पवार , बेटी बचाओ बेटी पढाओ च्या जिल्हाध्यक्ष अश्विनी हुबळीकर, जैन प्रकोष्ट महिला अध्यक्षा गीता रणदिवे, जिल्हाचिटणीस कल्पना जाधव, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस वैष्णवी कदम, जैन प्रकोष्ट महिला उपाध्यक्षा वृषाली दोशी, महिला मोर्चा सातारा शहर अध्यक्षा रीना भणगे, बेटी बचाओ बेटी पढाओ सातारा शहर अध्यक्षा सुचारीता कंडारकर, सातारा शहर उपाध्यक्षा चित्रा माने, चिटणीस कीर्ती पोळ, महिला मोर्चा शहर उपाध्यक्षा संगीता जाधव, ज्येष्ठ कार्यकर्ता आघाडी अध्यक्षा रोहिणी क्षीरसागर, ओबीसी मोर्चा महिला जिल्हा उपाध्यक्षा जयश्री पाटुकले , नंदा इंगवले आणि महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

महाबळेश्वर बाजारपेठेतील स्ट्रिट्ट लाईट गेली अनेक दिवसां पासुन बंद असल्याने

# बाजारपेठेत दुकानातील प्रकाश हाच पर्यटकांचा आधार



**महाबळेश्वर :** महाराष्ट्राचे नंदनवन म्हणुन प्रसिध्द असलेल्या महाबळेश्वर पालिकेचा कारभारी हा सक्षम नसल्याने महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणाला बकाल स्वरूप प्राप्त झाले आहे अनेक अडचणीचा सामना करीत असलेल्या या शहरातील प्रमुख बाजारपेठेतील स्ट्रिट्ट लाईट गेली अनेक दिवसां पासुन बंद असल्याने बाजारपेठेत दुकानातील प्रकाश हाच पर्यटकांचा आधार बनला आहे .

पाणी रस्ता आरोग्य व वीज या प्राथमिक सुविधा नागरीकांना पुरविणे हे महाबळेश्वर पालिकेचे कर्तव्य आहे परंतु याचा पालिकेला विसर पडला आहे. देश विदेशातुन वर्षा सहलीसाठी आलेल्या पर्यटकांनी महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण सध्या गजबजले आहे या पर्यटकां कडुन पालिका प्रवेश कर व प्रदुषण कर गोळा करते या बदल्यात पालिकेने पर्यटकांना उत्तम दर्जाच्या सर्व प्राथमिक सुविधा पुरविणे क्रमप्राप्त आहे. परंतु या गोष्टीचा पालिकेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी यांना विसर पडलेला दिसत आहे. महाबळेश्वर शहराच्या विविध भागातील स्ट्रीट लाईट हे गेली अनेक दिवसां पासुन बंद आहे लिंगमळा ते वेण्णालेक, वेण्णालेक ते महाबळेश्वर त्याच प्रमाणे महाबळेश्वरच्या मुख्य बाजारपेठेतील अनेक खांबावरील पथ दिवे गेली अनेक दिवस बंद आहेत सध्या पावसाळी हंगात सुरू आहे. बाजारपेठेतील अनेक दुकानातुन रस्त्यावर पडणाऱ्या प्रकाशात रस्ता दिसतो परंतु शहर परीसरातील दुकानातील पथ दिवे गेली अनेक दिवसां पासुन बंद असल्याने अनेक रस्त्यांवर अंधाराचे साम्राज्य पसरले आहे अशा रस्त्यांवरून चालताना पर्यटकां मध्ये भितीचे वातावरण पसरले आहे

महाबळेश्वर नगर पालिका वीज पुरवठा व त्यांची देखभाल दुरूस्ती या साठी लाखो रूपये खर्च करीत असते मग लाखो रूपये नेमके कशावर खर्च होतात व ते कोणाच्या खिशात जातात या विषयी शहरात उलटसुलट चर्चा सुरू आहे विशेष म्हणजे बाजारपेठेतील तथाकथील नेते हे बाजारबपेठेच्या प्रत्येक प्रश्नावर आग्रही असतात परंतु त्यांच्या दुकाना समोर असलेल्या विजेच्या खांबावरील दिवे बंद आहेत हे त्या नेत्यांना कसे दिसत नाही या बाबत शहरातुन आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# उत्तर कोरेगाव तालुक्यात मेडिकल डिव्हाईस हब उभारण्याची मागणी

### मयूर निकम यांची आ. रामराजेंकडे निवेदनाद्वारे मागणी

**कोरेगाव :** कोरेगाव तालुक्याचा उत्तर भाग हा कायम दुष्काळी असून तो कलंक पुसून काढण्यासाठी या भागात औद्योगिकीकरण आवश्यक आहे. आंध्रप्रदेशच्या धर्तीवर जर या परिसरात मेडिकल डिव्हाईस हब उभारला तर सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या हाताला कामाची संधी मिळून परिसराचा कायापालट होवू शकतो. याची ब्लू प्रिंट या भागातील मयूर निकम या तरुणाने आ. रामराजे ना. निंबाळकर यांना दिली आहे. यासाठी त्यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणीही केली आहे.

सध्या राज्यात येऊ घातलेला मेडिकल डिव्हाईस हब उत्तर कोरेगाव भागात आल्यास ग्रामीण भागाचा कायापालट होईल. त्यामुळे रोजगार निर्माण होवून स्थलांतर थांबेल. यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करणे अपेक्षित आहे. आंध्रप्रदेशमध्ये एक मेडिकल डिव्हाईस हब तयार करण्यात आल्याने तेथील परिसराचा ग्रामीण भागात कायापालट झाला आहे. हाच प्रकल्प उत्तर भागात आणणे आवश्यक आहे.

रोजगानिर्मिती होवून अनेक कुटुबांची आर्थिक वहिनी होवू शकते,निप्रो सारख्या मेडिकल कंपन्या आल्या तर आपल्या भागाचा रूपडं बदलू शकते,

यासाठी त्याचा शासन दरबारी पाठपुरावा करणे अपेक्षित आहे, आंध्रप्रदेशमध्ये एक सुंदर अस मेडिकल डिव्हॉईस हब बनवून तेथील ग्रामीण भागाचा कायापालट केलेला अतीशय चांगला प्रोजेक्ट तेथील स्थानिकांच्या मदतीने राज्य सरकार अन् केंद्र सरकारच्या मदतीनं भारताचे निर्यातीकरण धोरण ही साध्य करता आले. भारताची पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचं स्वप्न आपण साकार करू शकतो,आता या क्षेत्रात भारत पूर्णपणे चीन, अमेरीका यांसारख्या देशावर अवलंबून आहे, खरा आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अन् जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी सकारात्मक पाऊले उचलण्याची गरज आहे.

## अकोटात लाडकी बहीण योजनेचा अर्ज भरण्यासाठी तुफान

**अकोला :** राज्य सरकारने'लाडकी बहीण' या योजनेची नुकतीच घोषणा केली आहे. या योजनेचा लाभ घेण्याकरिता आवश्यक कागदपत्राची जुळवाजुळव करण्यासाठी सेतू व तलाठी कार्यालयासमोर प्रचंड गर्दी झाली असून, अकोट शहरात गर्दी हाताबाहेर जात आहे. तलाठी कार्यालय, सेतू केंद्रात रांगाच रांगा लागल्या आहे.

या गर्दीला आवर घालण्यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे

लाडकी बहीण' योजनेचा अर्ज भरण्यास १ जुलैपासून प्रारंभ झाला आहे. या योजनेत महिलांना १५०० रुपये दरमहा मिळणार आहेत. या योजनेचे ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी कागदपत्र जमा करणे सुरू झाले आहे. अकोट शहरातील पोपटखेड रोड व जुन्या तहसील कार्यालयात दाखले मिळवण्यासाठी सेतू केंद्र व तलाठी कार्यालयात गर्दी झाली आहे.

# पुणे जिल्ह्यात वन पर्यटनस्थळी सूर्यास्तानंतर बंदीच

### नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार

**पुणे :** लोणावळ्यातील भुशी धरणात घडलेल्या दुर्घटनेनंतर वनक्षेत्रात असलेल्यापर्यटनस्थळांमध्येसूर्यास्तानंतर प्रवेशावर बंदी आहे. या नियमाचे जिल्ह्यात यापुढे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत. तसेच या निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. यापुढे जिल्ह्यातीलपर्यटनस्थळांवरपर्यटकांची संख्या निर्धारित करून त्यांना ऑनलाइन पर्यटक परवाना देण्यासाठी व्यवस्था तयार करण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत

लोणावळ्यातील भुशी धरणात बुडून हडपसरमधील एकाच कुटुंबातील ६ जणांचा मृत्यू झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत सविस्तर परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार वनक्षेत्रातील पर्यटनस्थळांमध्ये सूर्यास्तानंतर प्रवेशबंदीच्या आदेशाचे काटेकोर पालन करण्याचे आदेश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत. हा नियम जुनाच असला तरी अशा पर्यटनस्थळांवर सर्रास पर्यटक दिसून येत आहेत. त्यामुळे त्यांच्या जिवाला धोका निर्माण होत आहे.

यापुढे या निर्णयाची अमंलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, वेल्हा, भोर, पुरंदर आणि इंदापूर या तालुक्यातील डोंगर, धबधबे, गडकिल्ले, घाट, धरण, तलाव आदी परिसरात पावसाळी पर्यटनाकरिता येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढील उपाययोजना करण्याचे आदेश त्यांनी यंत्रणांना दिले आहेत.

# क्राईम

### अपघातप्रकरणी रिक्षा चालकावर गुन्हा

**सातारा :** अपघातात एकाला जखमी केल्याप्रकरणी रिक्षा चालकाविरोधात शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, राधिका रोडवरील बारटक्के चौक परिसरात असलेल्या मटण दुकानासमोर थांबलेल्या ग्राहकाला रिक्षाने धडक दिल्याने मुस्ताक गुलाब खाटीक (वय ५१, रा. मंगळवार पेठ, सातारा) हे जखमी झाले. ही घटना दि. २८ जून रोजी घडली असून याची नोंद शाहूपुरी पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे.

### चेन स्नॅचिंग प्रकरणी अज्ञाताविरोधात गुन्हा

**सातारा :** चेन स्नॅचिंग प्रकरणी अज्ञाताविरोधात सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा लोकसभा निवडणूकीचा निकाल लागल्यानंतर पोवई नाका या बरोबरच मोती चौक येथे विजयी रॅली निघाल्यानंतर गर्दीचा गैरफायदा घेवून अनेकांचा चेन स्नॅचिंग झाले होते. त्याप्रकरणी सराईत टोळी पकडली असतानाच आणखी एकाची तक्रार दाखल झाली आहे.

अमित चंद्रकांत साळुंखे (वय ३४, सदाशिव पेठ, सातारा) यांनी सातारा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ५० हजार रुपये किंमतीची १ तोळा ७३ मिलीची सोन्याची चेन चोरली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

### अपघातातील जखमीचा मृत्यू

**सातारा :** सातारा-मेढा रस्त्यावर हामदाबाज येथे भरधाव कारने दुचाकीला धडक दिल्यानंतर झालेल्या अपघातात विशाल दत्तात्रय केंजळे (वय ३२, रा.मु.केंजळ पो.मोरावळे ता.जावली) यांना गंभीर दुखापत होवून त्यांचा मृत्यू झाला. यामध्ये त्यांचा भाचा व भाची जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. दरम्यान, विशाल केंजळे हे फौजी आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, ही घटना दि. २८ जुन रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. विशाल केंजळे हे दुचाकीवरुन कोंडवे ते केंजळे असे दुचाकीवरुन निघाले होते. दुचाकीवर त्यांच्या सोबत भाचा अथर्व (वय १०) व भाची प्राजक्ता (वय १७) हे होते. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास दुचाकी हामदाबाज येथील आनंदगृह सोसायटी परिसरात मुख्य रस्त्यावर आल्यानंतर एमएच ११ सीटी ४३०८ या कारची धडक बसली. सातार्यातून पुढे पुणे येथे उपचारासाठी दाखल केल्यानंतर दुसर्या दिवशी त्यांचा मृत्यू झाला.

### कोरेगाव येथील भांड्याचे दुकान अज्ञात चोरट्याने फोडले

**कोरेगाव :** कोरेगाव (जिल्हा सातारा) येथील मेन रोडवरील जैन मंदीरासमोरील एक भांड्याचे दुकान काल रात्री अज्ञात चोरट्यानी फोडून दुकानातील रोख नऊ हजार रुपयांसह एक लाख ३६ हजार ५०० रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबतकिरण पोपटलाल जैन, (वय ४१ वर्षे, व्यवसाय-भांड्याचे दुकान, रा. शांतीनगर, कोरेगाव) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले आहे की, येथील मेन रोडवर माझे वर्धमान मेटल नावेच भांड्याचे दुकान आहे. काल रात्री या दुकानाच्या मागिल बाजुस असलेला पत्रा कोणीतरी कशाच्या तरी सहाय्याने उचकटून दुकानात प्रवेश करून दुकानातील तांब्या- पितळेची, स्टीलची भांडी, दुकानातील लाकडी कपाटात असलेल्या लोखंडी तिजोरीत ठेवलेले रोख पैसे, बिल बुक व जीएसटी बिले अशा वर्णनाचा एकूण एक लाख ३६ हजार रुपये ५०० रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने मुद्दाम, लबाडीने, तसेच माझ्या संमतीशिवाय चोरुन नेला आहे. म्हणून माझी त्या अज्ञात चोरट्याविरुद्ध तक्रार आहे. अधिक तपास कोरेगाव पोलीस करीत आहेत.

# भुशी डॅम दुर्घटनेनंतर ताम्हिणी घाटात तरुण वाहून गेला

**पुणे, :** लोणावळ्यातील भुशी डॅम परिसरामधील पर्यटक वाहून जाण्याची घटना ताजी असतानाच आता आणखीन एक व्हिडिओ समोर आला आहे. मुळशी तालुक्यातील ताम्हिणी घाट परिसरामध्ये वर्षा विहारासाठी आलेला एका ३२ वर्षीय तरुण धबधब्याच्या पाण्यामध्ये वाहून गेल्याचे समोर आले आहे. याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. स्वप्निल धावडे असे वाहून गेलेल्या तरुणाचे नाव आहे. तो भोसरी परिसरातील राहणारा असल्याची माहिती समोर आली आहे.

जिममधील ३२ जणांच्या ग्रुपसोबत ताम्हिणी घाट परिसरामध्ये फिरायला आला होता. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर हा प्रकार समोर आला आहे. मुळशी तालुक्यातील ताम्हिणी घाट परिसरामध्ये पावसाची संततधार सुरू आहे. धबधब्यांमध्ये पाण्याचा प्रवाह देखील वाढू लागला आहे. या घटनेची माहिती मिळताच पौड पोलीस तसेच शिवदुर्ग टीम, ताम्हिणी घाट वनविभाग यांनी या तरुणांचे शोध कार्य सुरू केले होते. मात्र, तो मिळाला नव्हता. आज सकाळी शोध कार्य सुरू केल्यानंतर त्याचा मृतदेह रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे आढळून आला आहे. लोणावळ्यातील या घटनेनंतर ताम्हिणी घाट परिसरामध्ये देखील अशीच घटना घडल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे. पर्यटकांचा अति उत्साहीपणा देखील अशा घटनांसाठी जबाबदार असल्याचे पहायला मिळत आहे. व्हिडिओमध्ये दिसत असल्याप्रमाणे पाऊस सुरू असताना हा तरुण त्या धबधब्यात उडी मारताना पाहायला मिळत आहे. उडी मारल्यानंतर पाण्याच्या प्रवाहाबरोबर तो वाहून गेल्याचे देखील दिसत आहे. अंगावर शहारा आणणारा हा व्हिडिओ सोशल मीडियावर फिरतो आहे. अशा घटना रोखण्यासाठी वनविभागाने आणि प्रशासनाने कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. अन्यथा अशा पर्यटकांमुळे अनेकांना आपला जीव लागू शकतो.

# महाराष्ट्र शासन आरोग्य विभागाच्या शिरपेचात मानाचा तुरा

**कोरेगाव :** आपत्कालीन वैद्यकीय सेवा Dial १०८ च्या माध्यमातून एक करोड पेशंटला सर्विस देण्यात आली आहे . महाराष्ट्र शासनाच्या वतीने सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या माध्यमातून महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा २६ जानेवारी २०१४ पासून संपूर्ण महाराष्ट्रात सुरू करण्यात आली. महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेने १ करोड ७८७ इमर्जन्सी पेशंटना (२६ जानेवारी २०२४ पासून जून २०२४) सेवा दिली आहे. संपूर्ण महाराष्ट्रमध्ये ९३७ रुग्णवाहिकेच्या माध्यमातून २४७३६५ दिवस ही सेवा सुरु आहे. या रुग्णवाहिकेमध्ये असणारे अद्यावत उपकरणे तसेच प्रशिक्षित डॉक्टर्स आणि कर्मचारी यांच्या माध्यमातून ही सेवा पुरवण्यात येते. ही सेवा शहरी, दुर्गम तसेच अतिदुर्गम भागात पोहोचून पेशंटला वेळीच वैद्यकीय उपचार करते

यामुळे या सेवेचे मोठे महत्त्व आहे. या सेवेने हृदयविकार मोठे अपघात मेडिकल इमर्जन्सी अशा अनेक प्रकारच्या पेशंट ना जागेवरती तसेच दवाखान्यात नेत असताना च उपचार केल्यामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचले आहेत. सातारा जिल्ह्यामध्ये हा प्रकल्प चालू झाल्यापासून ते जून २०२४ पर्यंत ३८५४६४ रुग्णांना सेवा देण्यात आली आहे.

हि सेवा देण्याकामी, सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांचे मार्गदर्शन तसेच जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. अशी माहिती महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा सातारा जिल्हा व्यवस्थापक श्री राजेंद्र कदम यांनी दिली.

# खंबाटकी घाटात वाहतूक कोंडी

**खंडाळा :** खंबाटकी घाटात दत्तमंदिरा नजीक टेम्पो बंद पडल्याने सकाळ पासून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. दरम्यान,घाट रस्त्यावरील वाहतूक बारा वाजण्याच्या सुमारास पूर्ववत करण्यात पोलीसांना यश आले.

अशियाई महामार्गावर असणाऱ्या खंबाटकी घाटामध्ये पहाटे चार वाजण्याच्या सुमारास दत्त मंदिराजवळ टेम्पो बंद पडला होता.त्यामुळे सातारा बाजूकडे जाणारी वाहतूक खोळंबली. घाटातील दत्त मंदिरापासून लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

शनिवारी-रविवारी घरी जाण्याच्या गडबडीत महामार्गावर सकाळपासून वाहनांची वर्दळ आणि बरसणाऱ्या पावसाच्या सरींमुळे वाहतूक विस्कळीत झाली.त्यामुळे अनेक पर्यटक,प्रवासी सुमारे पाच तास खोळंबल्याची माहीती मिळत आहे.तर काही वेळ बोगदा मार्गे वाहतूक सुरू होती.सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास खासगी क्रेनच्या सहाय्याने बंद पडलेले वाहन बाजूला करण्यात आले. महामार्गचे पी.एस. आय.प्रकाश घनवट,पोलीस हवालदार मनोज गायकवाड,गणेश भोंग,प्रमोद फरांदे,खंडाळा पोलीस ठाण्याचे प्रकाश फरांदे,संजय पोळ यांनी वाहतूक पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न केले.



**सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. त्यामुळे महामार्गावरील खंबाटकी घाट,बोगदा मार्गावर वाहन बंद पडणे अथवा अपघात अशा घटना घडल्यास, वाहतुक कोंडीची शक्यता नाकारात येत नाही.खासगी क्रेनचा आधार घेत वाहन चालकांना रस्ता खुला करावा लागतो. त्यासाठी खंबाटकीत कायमस्वरूपी क्रेन सुविधा उपलब्ध करावी.अशी मागणी प्रवाशी वर्गातून होत आहे.**

# भारताने विश्वचषक जिंकताच साताऱ्यात दिवाळी साजरी

### फटाक्यांच्या आतषबाजीत तरुणाईचा जल्लोष



**सातारा :** भारत आणि दक्षिण आफ्रिका या संघांमध्ये शनिवारी रात्री ट्वेंटी-ट्वेंटी विश्वचषकाचा अंतिम सामना पार पडला. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या सामन्यात भारताने विजयश्री खेचून आणली. भारताने विश्वचषकावर नाव कोरताच राजधानी साताऱ्यात क्रिकेटप्रेमी तरुणांकडून अक्षरशः दिवाळी साजरी करण्यात आली. शहरातील चौकाचौकात फटाक्यांची जोरदार आतषबाजी करण्यात आली शिवाय विजयाच्या घोषणाही देण्यात आल्या.

विश्वचषकाच्या सामन्यात भारताने सुरुवातीपासूनच प्रतिस्पर्धी संघांपुढे आव्हान उभे करून आपला धबधबा कायम ठेवला. मात्र,भारत आणि साऊथ आफ्रिका या दोन संघांमधील विश्वचषकाच्या अंतिम सामन्याकडे अवघ्या जगाचे लक्ष लागले होते. हा सामना सुरू झाल्यापासून सर्वत्र उत्कंठा वाढत होती. जो-तो भारत जिंकावा अशी कामना करत होता. दहाव्या षटकानंतर दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी तुफान फटकेबाजी सुरू केल्याने भारत हा सामना गमावणार अशीच चिन्हे निर्माण झाली होती. त्यामुळे क्रिकेटप्रेमींचे चेहरेदेखील हिरमुसून गेले. मात्र, अखेरच्या काही षटकांत भारताच्या गोलंदाजांनी दक्षिण आफ्रिका संघाचे कंबरटे मोडून काढले अन् दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याचे स्वप्नही पूर्ण केले.

भारताने विजय मिळवताच अवघी तरुणाई जल्लोषात बुडाली. मध्यरात्री बारा वाजता साताऱ्यातील राजवाडा, मोती चौक, राजपथ तसेच ठीक ठिकाणी तरुणाई मोठ्या संख्येने एकत्र आली. यावेळी फटाक्यांची जोरदार आतषबाजी करण्यात आली. तरुणांकडून भारताच्या विजयाच्या घोषणाही देण्यात आल्या.